दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२३/२०१९
दि.२८/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.बी.एल.अगरवाल, श्री.कालाभैरव उपासना मंडळ, O/C ...............अपिलार्थी
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.बी.एल.अगरवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.१४/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) श्रीम.माणिक चौधरी (श्रीम.प्रांजल कदम) यांना महापालिकेने किती पगार/ वेतन दिला आहे. त्याची वर्षनिहाय माहिती व वेतन दाखला देण्यात यावे.
२) कोणकोणत्या विभागात कार्यरत होते त्याची माहिती देण्यात यावी.
३) सद्या कार्यरत असलेला विभाग कधीपासून कार्यरत आहेत. सदर कार्यरत विभागात पदस्थापना/ बदली आदेशाची प्रत.
४) त्यांचे विरुध्द नागरिकांनी केलेल्या तक्रारींची माहिती देण्यात यावी.
५) त्यांचा इन्कमटॅक्स नंबर देण्यात यावा.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अपेक्षिलेली माहिती देण्यात आली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१८/०२/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०१/०३/२०१९ रोजी दुपारी ०१.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०३०/२०१९ दि.२१/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग हे १४६ ओवळा माजिवडा निवडणूक कार्यालय येथे बैठकीसाठी गेले असल्याकारणाने सुनावणीस अनुपस्थित असुन सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

Scanned by CamScanner

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.१४/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार अपेक्षिलेली माहिती देण्यात आलेली नाही.

२) **<u>सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्दा क्र.२ ते ५ ची माहिती दिलेली असुन त्यापैकी मुद्दा क्र.१ ची माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.बी.एल.अगरवाल, श्री.कालाभैरव उपासना मंडळ,
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

6/3/19

6/03/19

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner